भद्रावती शिक्षण संस्था भद्रावती व्दारा संचालीत

निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालय भद्रावती, जि. चंद्रपुर

विद्यापीठ स्तरीय राष्ट्रीय सेवा योजना शिबिर

"स्वच्छ भारत सुंदर भारत''

दि. १७ जानेवारी २०१६ ते २३ जानेवारी २०१६

**शिबीर स्थळ :- आदर्श ग्राम चंदनखेडा ता. भद्रावती जि. चंद्रपुर**

प्रति,

मा. प्राचार्य

..........................................................................................................................

**विषय :- विद्यापीठ स्तरीय राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात विद्यार्थ्यांना पाठविण्याबाबत.**

महोदय,

आपणांस कळविण्यात अत्यंत आनंद होत आहे की, आमच्या महाविद्यालयाव्दारे गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली अंतर्गत **"स्वच्छ भारत सुंदर भारत''** या संकलपनेवर आधारीत विद्यापीठस्तीय स्तरीय राष्ट्रीय सेवा योजना विषेश शिबीराचे आयोजन दि. १७ जानेवारी २०१६ ते २३ जानेवारी २०१६ या कालावधीत आदर्श गांव **चंदनखेडा** या परीसरात आयोजित केलेले आहे.

आपणांस विनंती आहे की, आपल्या महाविद्यालयातील रासेयो पथकातील ०२ स्वयंसेवक व ०२ स्वयंसेवीका सहभागी होण्याकरिता पाठवावे, याकरिता हे आग्रहाचे निमंत्रण

आपले विनीत

| | | |
|---|---|---|
| प्रा. कुंदन शहारे | डॉ. ईश्वर मोहुर्ले | प्राचार्य |
| कार्यक्रम अधिकारी | राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक | डॉ. एल. एस लडके |
| राष्ट्रीय सेवा योजना | गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली | निळकठराव शिंदे महाविद्यालय भद्रावती. |
| मो. ९७३०४३५७५५ | | |
| प्रा. डॉ. प्रमोद सरदार | डॉ. शशीकांत सित्रे | |
| मो. ७२७६६२८३१२ | मो. ९८८१७२३६१२ | |

शिबिराची नियमावली

भद्रावती शिक्षण संस्था भद्रावती व्दारा संचालीत

निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालय भद्रावती, जि. चंद्रपुर

विद्यापीठ स्तरीय राष्ट्रीय सेवा योजना शिबिर

"स्वच्छ भारत सुंदर भारत"

दि. १७ जानेवारी २०१६ ते २३ जानेवारी २०१६

शिबीर स्थळ :- आदर्श ग्राम चंदनखेडा ता. भद्रावती जि. चंद्रपुर

तपशिल

१ शिबीराचे स्थळ :- जि. प. उच्च प्राथमिक शाळा चंदनखेडा ता. भद्रावती जि. चंद्रपुर

२. शिबीर कालावधी :- दि. १७ जानेवारी २०१६ ते २३ जानेवारी २०१६

३. शिबीरात उपस्थित होण्याचा दिवस :- सर्व शिबीरार्थ्यांनी रविवार दि. १७ जानेवारी २०१६ ला दुपारी १२.०० ते ३.०० वाजेपर्यत निळकंठराव शिंदे महाविद्यालयात भद्रावती येथे एकत्र यावयाचे आहे.

४.शिबीराची दिनचर्या :- पहाटे ५.०० वाजता जागर

सकाळी ६.०० वाजता प्राणायम व योगासन

सकाळ ७.३० ते ८.०० प्रभातफेरी सोबत प्रबोधन

सकाळी ८.३० अल्पोहार

सकाळी ९.०० ते ११.०० श्रमदान

दुपारी १२.०० ते १.०० जेवण

दुपारी १.०० ते २.०० विश्रांती

दुपारी २.०० ते ५.०० बौध्दीक सत्र

सायं ६.०० ते ७.०० सामुहिक प्रार्थना

सायं ७.०० ते ८.०० जेवण

रात्री ८.०० ते १०.०० सांस्कृतिक कार्यक्रम

रात्री १०.०० वाजता झोपणे

५. निवास व भोजन :- सर्व शिबीरार्थ्यांची निवास व भोजनाची व्यवस्था आयोजकातर्फे करण्यात येईल.

६. प्रवास खर्च :- शिबीरार्थ्यांचा प्रवास खर्च संबधीत महाविद्यालयाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित अनुदानातुन करावा.

७. शिबीरातील विशेष :- १. व्यसनमुक्ती २. अंधश्रध्दा निर्मूलन ३. पर्यावरण माहिती ४. राष्ट्रीय एकात्मता ५. मानवी मुल्य ६ श्रम संस्कार ७.स्वच्छता अभियान ८. व्यक्ती मत्व विकास

८. शिबीराचे उद्घाटन :- १८ जानेवारी २०१६ दुपारी १२.०० वाजता मा. नामदार हंसराज अहिर ( केंन्द्रीय राज्य मंत्री खते व रसायन भारत सरकार ) यांच्या हस्ते.

९.दुरध्वनी क्र :- प्राचार्य डॉ. एल. एस. लडके ९४२१७२१८९५ प्रा. कुदन शहारे ९७३०४३५७५५ प्रा. प्रमोद सरदार ७२७६६२८३१२

## शिबिराची नियमावली

१. शिबीरार्थी आपल्या पालकाच्या व महाविद्यालयाच्या परवानगीने शिबीरात सहभागी होत आहे असे गृहीत धरून शिबीरात एखादा अपघात व दुखापत झाल्यास व अन्य कारणाने शिबीरार्थ्यांना, पालकांना नुकसान भरपाई मागता येणार नाही.

२. शिबीरात एकदा दाखल झाल्यानंतर शिबीर परीसर सोडुन आपल्या मर्जीप्रमाणे गावात व अन्य ठिकाणी जाता येणार नाही.

३. शिबीराच्या संपुर्ण कालावधीत शिस्त व शांतता राखावी

४. शिबीर प्रमुखांनी तसेच वरीष्ठांनी केलेल्या सुचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

५. नेमुन दिलेले कामे व प्रकल्प जबाबदारीने पुर्ण करावे लागतील

६. प्रत्येक शिबीरार्थ्याला प्रत्येक कार्यक्रमांकत सहभागी व्हावे लागेल.

७. बेशिस्तपणा नजरेस आल्यास त्यांना शिक्षा करण्यात येईल. किंवा त्यांना शिबीरातुन परत पाठविण्यात येईल. व त्याचे नांव संबधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांना कळविण्यात येईल.

८.विद्यार्थ्यांनी आपल्या सोबत ताट, वाटी, ग्लास, बेडींग इत्यादी साहित्य आणावे.

९.गुटखा, तंबाखु, धुम्रपान व मध्यपान करता येणार नाही. आढळल्यास संबधिताला तात्काळ शिबीरातुन काढुन टाकण्यात येईल.

१०. शिबीर स्थळी येतांना प्राचार्यांचे प्रामाणित प्रवेश पत्र व जोखीम पत्र तत्काळ जमा करणे अनिवार्य राहील व सोबत महाविद्यालयाचे ओळखपत्र असणे अनिवार्य आहे.

११.ज्या ठिकाणी शिबीर घेण्यात येत आहे त्या स्थळाचे किंवा तेथिल साहित्याने नुकसान होणर नाही याची काळजी घ्यावी

१२. कार्यक्रम पत्रीकेत आवश्यकतेनुसार बदल करण्याचे सर्व अधिकार प्राचार्याना राहिल.

आपण त्वरीत अनुमती दर्शक पत्र व विद्यार्थ्यांचे नांवे पाठवावीत हि विनंती.

टिप

सर्व रासेयो शिबीरात सहभागी होणा-या विद्यार्थ्यांनी निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालय भद्रावती जि. चंद्रपुर येथे दि. १७.०१.१६ ला रविवार दुपारी ३.०० वाजेपर्यत हजर रहावे. याच ठिकाणावरून शिबीर स्थळी नेण्यात येईल. .

भद्रावती शिक्षण संस्था भद्रावती व्दारा संचालीत

निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालय भद्रावती जी. चंद्रपूर

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

स्वच्छ भारत–सुंदर भारत या संकल्पनेवर आधारित

राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यापीठ स्तरीय शिबीर चंदनखेडा

दि. १७ जानेवारी २३ जानेवरी २०१६

## जोखीम पत्र

माझ्या विनंतीवरून माझे नांव दाखल झाल्यामुळे कुठल्याही प्रकारचे शिबीर/सत्र/रासेयो अंतर्गत येणारे उपक्रम व प्रवास अनुभवत असतांना मि जबाबदारीपुर्वक असे स्वीकार करतो/करते की, शिबीरात सहभाग सत्र रासेयो अंतर्गत प्रशिक्षण उपक्रम व प्रवास यामध्ये कुठल्याही प्रकारची वा मालमत्तेचे नुकसान व व्यक्तीला झालेली नुकसान (नुकसानीमुळे मृत्यु झाल्यास) या संदर्भातली अथवा माझे व्यवस्थापक सरकारच्या विरोधात किंवा कुठल्याही रासेयो अधिका–याच्या विरोधात/प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी/कार्यक्रम समन्वयक/राज्य संपर्क अधिकारी/युवा अधिकारी सहायक कार्यक्रम सल्लागार/यांच्या विरोधात कुठल्याही प्रकारचा दावा करणार नाही. आणि अशी कुठलीही हानी किंवा नुकसान (नुकसानीमुळे मृत्यु झाल्यास) झाल्यास भारत सरकार वर निर्देशित केलेल्या कुठल्याही अधिका–यावर नुकसान भरपाई देण्याचे दायित्व राहणार नाही. असे मि समजतो.

मी असे स्विकार करतो की, मि माझे व्यवस्थापक व प्रशासक हे भारत सरकार कुठल्याही रासेयो अधिकारी व भारत सरकारच्या सेवेतील कोणतीही व्यक्ति यावर कोणताही दावा करणार नाही. तृतीय पक्षकार म्हणुन त्याच्या विरोधात जाणार नाही. किंवा वर निर्देशित प्रशिक्षण शिबीर/सत्र/रासेयो शिबीर/रस्ता, रेल्वे, समुद्र, नदी व विमान या संदर्भात हलगर्जीपणाच्या कुठल्याही वृत्तीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितित विरोधात जाणार नाहीत.

स्वयंसेवकाची सही ..............................

सहीचे साक्षितदार १..............................

२..............................

माझा पाल्य ही/हा माझ्या संमतीने रासेयो निळकंठराव शिंदे महाविद्यालय भद्रावती जि. चंद्रपूर यांच्या वतीने आयोजीत विषेश शिबीरात सहभागी होत आहे.

पालकाची सही.......................